# इतिहास अधिविभाग

मराठी भाषा, महाराष्ट्राचा इतिहास आणि संस्कृती यांच्या अध्ययन संशोधनाला उत्तेजन देणे हा शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेचा प्रमुख उद्देश होता. स्वातंत्र्यपूर्व काळात इ. स. १९३० च्या दशकात राजाराम कॉलेजचे तत्कालिन प्राचार्य व विख्यात इतिहास संशोधक कै. डॉ. बाळकृष्ण यांनी दक्षिण महाराष्ट्रासाठी युगप्रवर्तक छ. शिवाजी महाराजांच्या नावाने स्वतंत्र विद्यापीठ स्थापण्याचे स्वप्न सर्वप्रथम रंगवले होते. ते स्वप्न १९६२ साली साकार झाले. शिवाजी विद्यापीठात पहिल्या टप्प्यात सुरु झालेल्या पदव्युत्तर अधिविभागात इतिहास विभागाचा समावेश होता. दि. ०९ नोव्हेंबर १९६४ रोजी शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास विभागाचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले. मराठ्यांच्या इतिहासाचे गाढे अभ्यासक, व्यासंगी संशोधक डॉ. आप्पासाहेब पवार शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरु होते आणि त्यांनी एक तपाहून जास्त काळ विद्यापीठाच्या कारभाराची धुरा सांभाळली. त्यामुळे विद्यापीठाच्या इतिहास विभागाच्या भावी वाटचालीची त्या काळात भक्कम पायाभरणी झाली. आज आमच्या विभागाचा चांगला नावलौकिक झाला असून तो दूरवर पसरू लागला आहे. अखिल भारतीय इतिहास परिषदेचे तत्कालीन अध्यक्ष प्रा. जे. व्ही. नाईक, मुंबई यांनी भारताचे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे इतिहासकार पद्मभूषण प्रा. इरफान हबीब, अलिगढ यांच्याशी चर्चा करताना (History Department of Shivaji University is the most vibrant department in Maharashtra now!) असा उल्लेख केला होता. सुरवातीच्या काळात (इ. स. १९७८ पर्यंत) मराठा इतिहास संशोधन कक्ष (Research Cell) इतिहास विभागाशी संलग्न होता. त्या कक्षात एक संशोधक सहकारी व एक संशोधन सहाय्यक कार्यरत होते. पोर्तुगीज भाषेचे तज्ज्ञ, इतिहास संशोधक व मराठी कादंबरीकार कै. स. शं. देसाई आपल्या सेवा निवृत्तीपर्यंत संशोधन सहकारी म्हणून काम करत होते. डॉ. जयसिंगराव पवार व डॉ. बी. डी. खणे यांनी काही काळ संशोधन सहाय्यक पदावर काम केले. हा संशोधन कक्ष कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या मार्गदर्शनाखाली काम करत होता. त्यामुळेच या संशोधन कक्षामार्फत मराठ्यांच्या इतिहासावरील अनेक चांगले संदर्भ साधन ग्रंथ प्रकाशित करण्यात आले. इतिहास संशोधनाच्या क्षेत्रात शिवाजी विद्यापीठाची स्वतंत्र प्रतिमा तयार होण्याला त्यामुळे प्रारंभ झाला.

मराठ्यांचा इतिहास, आधुनिक महाराष्ट्र आणि दक्षिणी संस्थान हे आमच्या विभागाचे संशोधन अभ्यासाचे खास क्षेत्र (Thrust area of research) आहे. या विभागास प्राध्यापक – ०२, सहयोगी प्राध्यापक – ०२, प्रपाठक व अधिव्याख्याता - ०४ अशी एकूण आठ पदे मंजूर असून, संशोधक सहाय्यकाचे एक पदही विभागात आहे. कै. डॉ. व्ही. डी. राव (०९ - ११ - १९६४ ते १९ – ०९ – १९६९ )हे पहिले विभागप्रमुख होते. विद्यार्थी व प्राध्यापक यांना आवश्यक असणाऱ्या सोयी सुविधांनी विभाग सुसज्ज बनला आहे. विभागाचे स्वत:चे स्वतंत्र छोटेखानी ग्रंथालय आहे. त्याचप्रमाणे विभागात जुनी दुर्मिळ पेंटिंग्ज, नाणी व प्राचीन अवशेष यांचाही संग्रह आहे. संगणक, इंटरनेट, स्लाईड व ओव्हरहेड प्रोजेक्टर, मायक्रोफिल्म रिडर, दूरदर्शन संच, कॅमेरा इ. साधने व सुविधा इतिहास विभागात उपलब्ध आहेत.

संशोधन आणि प्रकाशन या क्षेत्रातील इतिहास विभागाची प्रगती उल्लेखनीय आहे. पूर्वीचा मराठा इतिहास संशोधन कक्ष आणि इतिहास विभाग या दोहोंनी मिळून लहान – मोठे ३२ ग्रंथ प्रकाशित केले आहेत. त्यापैकी १७ ग्रंथांची निर्मिती विभागातील आजी – माजी प्राध्यापक आणि संशोधन सहाय्यक यांनी केली आहे. विभागातील प्राध्यापकांचे शंभराहून अधिक संशोधनपर ग्रंथ प्रकाशित झालेले असून वृत्तपत्रे, ग्रंथ, नियतकालिके इ. मधून त्यांचे ५० च्या आसपास विविध विषयावरील लेखही प्रसिध्द झाले आहेत. आमच्या विभागाने आजपर्यंत ०५ संशोधन प्रकल्प पूर्ण केले आहेत. इतिहास विभागातील प्राध्यापक आणि संशोधक विविध राज्यस्तरीय, राष्ट्रीय

आणि आंतरराष्ट्रीय चर्चासत्रांमध्ये सहभागी होऊन आपले शोधनिबंध सदर करतात. विविध चर्चासत्रांमध्ये सहभागी होऊन शोधनिबंध सादर करतात. विविध चर्चासत्रांमध्ये सादर करण्यात आलेल्या शोध निबंधाची संख्या जवळपास २०० इतकी आहे. विभागातील प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली विविध विषयांवर आतापर्यंत १२० विद्यार्थ्यांनी एम. फिल. व ६५ विद्यार्थ्यांनी पीएच. डी. चे संशोधन पूर्ण केले आहे.

आमच्या विभागाने पुढाकार घेऊन जून २००३ मध्ये मराठा इतिहास संशोधन केंद्राची स्थापना केली. कै. डॉ. आप्पासाहेब पवार यांनी सुरु केलेली मराठ्यांच्या इतिहासातील संशोधनाची परंपरा पुनरुज्जीवीत करून पुढे वाढविणे हा या केंद्राचा उद्देश आहे. महाराष्ट्र शासनाने सदर केंद्रास मान्यता देवून "छत्रपती शाहू महाराज सेंटर फॉर स्टडीज् ऑफ मराठा हिस्ट्री" असे त्याचे नामाभिधान केले आहे. राज्य शासनाने या केंद्रासाठी १ कोटी रुपयांचे अर्थसहाय्य आणि आठ पदे मंजूर केली आहेत. या केंद्राचे उद्धाटन देशाचे तत्कालीन कृषिमंत्री मा. श्री. शरदचंद्र पवार यांच्या हस्ते जुलै २००६ मध्ये करण्यात आले. प्रा. डॉ. अ. रा. भोसले यांनी या केंद्राचे संस्थापक समन्वयक म्हणून प्रारंभीच्या काळात काम केले. त्यांच्यानंतर डॉ. एम. ए. लोहार यांनी या केंद्राचे समन्वयक म्हणून काम पाहिले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली या संशोधन केंद्राने अनेकविध उपक्रम सुरु केले आहेत. सध्या डॉ. निलांबरी जगताप या संशोधन केंद्राचे सहाय्यक समन्वयक म्हणून कामकाज पाहतात.

शिवाजी विद्यापीठाचा इतिहास विभाग व छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या जन्मशताब्दी वर्षात (२००५ – ०६) अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. दि. ०६ ते ०८ डिसेंबर २००५ या कालावधीत "स्टडीज् इन डेक्कन हिस्ट्री : वुईथ स्पेशल रेफरन्स टू महाराष्ट्र" या विषयावर आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. सदर चर्चासत्रामध्ये देशविदेशातील शंभराहून अधिक संशोधक, प्राध्यापक सहभागी झाले होते. त्यामध्ये इरिना ग्लुश्कोव्हा, युजेनिया व्हनिना (रशिया), ली शेलीशिंगर (अमेरिका), मिचीहिरो ओगावा (जपान), बरून डे, प्रो. जे. व्ही नाईक, अ. रा. कुलकर्णी (जेष्ठ इतिहास संशोधक) इत्यादींचा प्रमुख सहभाग होता. या चर्चासत्रात सादर झालेल्या शोधनिबंधाचे ग्रंथरूपाने प्रकाशन करण्यात आले. डॉ. आप्पासाहेब पवार जन्मशताब्दी वर्षात त्यांनी इ. स. १९३४ साली लंडन विद्यापीठाला पीएच. डी. पदवीसाठी सादर केलेल्या 'द रेन ऑफ छत्रपती शाहू' (१७०८ – १७४९) या प्रबंधाची प्रत मिळविण्यात इतिहास विभागाला यश मिळाले. त्यासाठी आमच्या सध्याच्या विभागप्रमुख डॉ. नंदा पारेकर यांनी लंडनला गेले असताना विशेष परिश्रम घेतले. डॉ. पवारांचा बरीच वर्षे दुर्लक्षित राहिलेला प्रबंध ग्रंथरूपाने प्रकाशित केला गेला. या प्रकाशनाचा कार्यक्रम जून २०१३ मध्ये तत्कालीन बिहारचे राज्यपाल डॉ. डी. वाय. पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. दि. ०६ ते ११ फेब्रुवारी २००६ या कालावधीत डॉ. आप्पासाहेब पवार स्मृती व्याख्यानमालेचे आयोजन करून त्या अंतर्गत डॉ. विद्या गाडगीळ, डॉ. टी. टी. महाजन, डॉ. एन. जी. भवरे, डॉ. सुमित्रा कुलकर्णी व डॉ. जयसिंगराव पवार या मान्यवर संशोधकांची मराठ्यांच्या इतिहासाच्या विविध पैलूवर प्रकाश टाकणारी व्याख्याने आयोजित करण्यात आली होती. सदर व्याख्याने ग्रंथरूपाने प्रकाशित करण्यात आली. त्याचप्रमाणे डॉ. आप्पासाहेब पवार स्मृती व्याख्यान मालेचे इतिहास विभाग व छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्र यांच्यामार्फत दरवर्षी आयोजन करण्याचेही ठरविले गेले. नवोदित संशोधकांना मराठ्यांच्या इतिहासात नवीन संशोधन करणे सुलभ व्हावे व त्यांना त्यात गोडी वाटावी यासाठी इतिहास विभाग व छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्यासन केंद्र यांच्यामार्फत दरवर्षी मोडी शिकविण्याचे वर्ग घेण्यात येतात. त्याला विद्यार्थ्यांचा व नागरिकांचाही उदंड प्रतिसाद लाभत आहे. इतिहास विभाग व कै. दादा उंडाळकर प्रतिष्ठानच्या वतीने इतिहास, राज्यशास्त्र व वृत्तपत्र विद्या विभागांनी संयुक्तरीत्या तीन राष्ट्रीय चर्चासत्रे आयोजित केली. त्यापैकी एकातील

शोधनिबंध पुस्तक शिवाजी विद्यापीठाने प्रकाशित केले आहे. विभागामार्फत २००७ पासून पी. जी. डिप्लोमा ऑफ म्युझिओलॉजी हा कोर्स सुरु करण्यात आला असून या कोर्सला विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद आहे.

इतिहास विभागामार्फत दि. ३० नोव्हेंबर ते ०२ डिसेंबर २०१६ या कालावधीत 'इतिहास अधिविभाग व असोसिएशन ऑफ थर्ड वर्ल्ड स्टडीज् साउथ एशिया चाप्टर' यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचे व वार्षिक अधिवेशनाचे आयोजन करण्यात आले होते. सदर चर्चासत्रामध्ये देशविदेशातील सव्वाशेहून अधिक संशोधक, प्राध्यापक सहभागी झाले होते. या चर्चासत्रासाठी असोसिएशन ऑफ थर्ड वर्ल्ड स्टडीज् साउथ एशिया चाप्टरचे अध्यक्ष डॉ. ई. जेम्स आर. डेनियल, डॉ. के. सदसिवन (सचिव), डॉ. पी. वसुमाथ्यु देवी उपस्थित राहिले व त्यांनी या चर्चासत्रात तरुण संशोधकांना तसेच प्राध्यापकांना मार्गदर्शन केले. या आंतरराष्ट्रीय चर्चासत्रासाठी विभागाच्या तत्कालीन विभागप्रमुख प्रा. डॉ. पद्मजा पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले. त्यांनी असोसिएशन ऑफ थर्ड वर्ल्ड स्टडीज् साउथ एशिया चाप्टरच्या स्थानिक सचिव म्हणून काम पहिले. या आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात शंभराहून अधिक प्राध्यापक व संशोधकांनी संशोधनपर शोधनिबंधाचे वाचन केले.

भारत सरकारच्या मानव संसाधन विकास मंत्रालय पुरस्कृत व शिवाजी विद्यापीठ आयोजित "GIAN" या उपक्रमार्तगत इतिहास विभागाने दि. ०४ ते १२ ऑगस्ट २०१६ या कालावधीत " द डेक्कन इन द एथीन्थ सेंचुरी" या विषयावर व्याख्यानाचे आयोजन केले होते. यासाठी युनिव्हर्सिटी ऑफ मिशिगन मधून डॉ. स्टीवर्ट गॉर्डन यांना मार्गदर्शनासाठी बोलाविण्यात आले होते. यामध्ये ६० संशोधक विद्यार्थी, प्राध्यापक यांचा समावेश होता. या कोर्सचे समन्वयक म्हणून विभागातील डॉ. अवनीश पाटील, डॉ. निलांबरी जगताप यांनी काम पहिले.

इतिहास विभागाच्या आजी – माजी विद्यार्थ्यांची नेट – सेट आणि तत्सम अन्य स्पर्धा – परीक्षा करिता पूर्वतयारी करून घेण्यासाठी वेळोवेळी विविध उपक्रम राबविले जातात. त्यामध्ये मेमोरियल कोचिंग प्रोग्रम, विविध कार्यशाळा, तज्ज्ञांची मार्गदर्शनपर व्याख्याने इ. बाबींचा समावेश असतो. विभागातील प्राध्यापकांचे मार्गदर्शन व उत्तेजन आणि विद्यार्थ्यांचे परिश्रम व जिद्द यांचा परिपाक म्हणजे आमच्या विभागातील जवळजवळ ५० विद्यार्थी नेट – सेट परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत.

इतिहास विभागाचे माजी विद्यार्थी महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेरही वेगवेगळ्या क्षेत्रात कार्यरत आहेत. विश्वास नांगरे-पाटील, सूरज वाघमारे, रविराज फल्ले, प्रकाश शिंदे, नीलिमा बोरवणकर, ज्योती आमणे, माधवी व्हटकर, सागर व्हटकर, वीणा मोरे, सिद्धेश्वर शिंदे इ. विभागाचे माजी विद्यार्थी राज्य प्रशासनातील अनेक महत्त्वाची पदे समर्थपणे सांभाळत आहेत. आमच्या विभागाचे बहुसंख्य माजी विद्यार्थी शिक्षण क्षेत्रात अध्यापनाचे कार्य करत आहेत. इतिहास विभागाच्या माजी विद्यार्थ्यांची संघटना स्थापन झाली असून, त्यातील बहुतेक सर्व जण शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषदेचेही सदस्य आहेत.

शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद या नावाचे इतिहास संशोधन व अध्ययनाला प्राधान्य देणारे व्यासपीठ निर्माण करण्यात शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास विभागाने सुरुवातीपासून मौलिक कामगिरी बजावली आहे. इतिहास परिषदेचे कामकाज विद्यापीठाच्या इतिहास विभागातूनच चालते. शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषदेची आजवर २३ अधिवेशने झाली असून १३ खंडही प्रकाशित झाले आहेत. शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषदेमार्फत य. दि. फडके, सदानंद मोरे, डॉ. अरविंद गणाचार्य अशा अनेक नामवंत वक्त्यांची व्याख्याने आयोजित केली गेली आहेत. विभागाला आय. सी. एच. आर. यु. जी. सी. यासारख्या नामवंत संस्थाकडून संशोधनासाठी तसेच संशोधन प्रकल्पासाठी विविध चर्चासत्रासाठी, कार्यशाळासाठी इतिहास परिषदेच्या अधिवेशनासाठी अनुदान मोठ्या प्रमाणात मिळालेले आहे. सध्या विभागामध्ये महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे ज्ञानमंडळ – आधुनिक

इतिहास (भारतीय आणि जागतिक) कार्यरत आहे. व त्यातून अनेक तरुण प्राध्यापकांमार्फत व संशोधकांमार्फत नोंदी लिहिण्याचे काम चालू आहे. या ज्ञानमंडळाचे समन्वयक म्हणून विभागातील डॉ. अवनीश पाटील हे काम पाहत आहेत. तसेच आमच्या विभागाचे माजी विभागप्रमुख डॉ. अरुण भोसले यांची महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाच्या सदस्यपदी निवड झाली आहे. विद्यापीठात लोकनेते बाळासाहेब देसाई अध्यासनाच्या स्थापनेपासून म्हणजे २०१६ पासून याचे समन्वयक म्हणून विभागातील डॉ. अवनीश पाटील कामकाज पाहतात. या अध्यासनामार्फत दरवर्षी विविध तज्ज्ञ वक्त्यांना निमंत्रित करून लोकनेते बाळासाहेब देसाई व एकूणच महाराष्ट्राच्या सामाजिक , आर्थिक व राजकीय इतिहासाशी संबंधित व्याख्याने आयोजित केली जातात.

शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास विभागात दरवर्षी शिक्षक दिन, पर्यटन दिवस, सावित्रीबाई फुले जयंती व सांस्कृतिक दिवस इ. उत्साहाने साजरे केले जातात. त्याचप्रमाणे दरवर्षी विद्यार्थ्यांसाठी अभ्यास सहलीचे आयोजन केले जाते. अशा उपक्रमांमुळे इतिहास विभागातील वातावरण नेहमीच सौहार्दपूर्ण असते. प्राध्यापक – विद्यार्थी संबंध जिव्हाळ्याचे आहेत. १९ मार्च २०१८ रोजी झालेल्या विद्यापीठाच्या ५४ व्या पदवीदान समारंभात आमच्या विभागाची विद्यार्थिनी प्रियांका पाटील हिला विद्यापीठाच्या ‘ राष्ट्रपती पुरस्काराने’ सन्मानित करण्यात आले. ही विभागासाठी अभिमानास्पद अशी बाब आहे. सध्या विभागात डॉ. नंदा पारेकर या विभागप्रमुख म्हणून कार्यरत आहेत तसेच डॉ. अवनीश पाटील हे सहाय्यक प्राध्यापक म्हणून विभागात कार्यरत आहेत व श्री. दत्तात्रय मचाले हे हंगामी सहाय्यक प्राध्यापक म्हणून विभागात कार्यरत आहेत. शिवाजी विद्यापीठाच्या गौरवशाली इतिहासातील मानाचे पान इतिहास विभागाच्या नावे असावे अशी आमची महत्त्वकांक्षा आहे.

● विभागाकडून पूर्ण करण्यात आलेले संशोधन प्रकल्प :-

1) Kolhapur through the ages – Dr. B. R. Kamble
2) Kolhapur and its Feudatories – Dr. B. R. Kamble
3) Jain Community in Kolhapur District (1947-2000) – Dr. B. D. Khane (2000-03)
4) Non-Bramin Movement in south India – D. Padmaja Patil
5) Kopeshwar Temple, Khidrapur – Dr. Avanish Patil

● UGC visiting Fellow Programme of month duration :-

1) Prof. K. Mujumdar , Nagpur – 2000.
2) Prof. A. M. Deshpande, Pune – 2001.
3) Prof. J. V. Naik, Mumbai – 2002.

● व्याख्यानमाला :-

१) डॉ. आप्पासाहेब पवार व्याख्यानमाला
२) कै. सीताबाई कुलकर्णी स्मृती व्याख्यानमाला

● इतिहास विभागातील निवडक व्याख्याने :-

१) अ. रा. कुलकर्णी (जेष्ठ इतिहाससंशोधक, माजी अध्यक्ष, इंडियन हिस्ट्री कॉंग्रेस)
२) जे. व्ही. नाईक (माजी अध्यक्ष, इंडियन हिस्ट्री कॉंग्रेस)
३) जी. टी. कुलकर्णी (जेष्ठ इतिहाससंशोधक, माजी अध्यक्ष, इंडियन हिस्ट्री कॉंग्रेस)
४) हरबन्स मुखिया ( माजी प्र – कुलगुरू, जवाहरलाल नेहरू विद्यापीठ, नवी दिल्ली)

५) दिलबगसिंग (प्रोफेसर, जवाहरलाल नेहरू विद्यापीठ, नवी दिल्ली)
६) अनिरुध्द रे (कलकत्ता)
७) बरून डे (कलकत्ता)
८) मकरंद मेहता (अहमदाबाद)
९) सुरेंद्र राव (मंगलोर)
१०) गेल ऑमवेद (शलाका पाटणकर) (सातारा)
११) प्रो. रतनलाल हंगलू (माजी कुलगुरू, अलाहाबाद विद्यापीठ, अलाहाबाद)
१२) प्रो. लक्ष्मीनारायण राऊत (बेहरामपूर)
१३) डॉ. वर्षा शिरगावकर (मुंबई)
१४) डॉ. रुबी मलोनी (मुंबई)
१५) डॉ. जयसिंगराव पवार (जेष्ठ इतिहाससंशोधक)
१६) डॉ. राजा दीक्षित (सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे)
१७) कै. डॉ. अरुण टिकेकर (मुंबई)
१८) प्रा. एस. शेट्टर (बेंगलोर) (माजी चेअरमन, इंडियन कौन्सिल ऑफ हिस्ट्रॉरिकल रिसर्च)
१९) श्री. जयंत लेले (कॅनडा)
२०) श्री. एन. के. वागळे (कॅनडा)
२१) स्टीवर्ट गॉर्डन (मिशिगन विद्यापीठ)

● विभागामार्फत परदेशी संशोधनासाठी किंवा परिषदेसाठी गेलेले प्राध्यापक :-
१) डॉ. अरुण भोसले :- ब्रिटीश कौन्सिल फेलो, इंग्लंड, १९८१.
२) डॉ. अरुण भोसले :- ९ वे आंतरराष्ट्रीय चर्चासत्र – सेंटपॉल – यु. एस. ए., २००१.
३) डॉ. नंदा पारेकर :- जपान, लंडन, श्रीलंका
४) डॉ. पद्मजा पाटील :- फिनलंड

● विभागातील आतापर्यतचे विभागप्रमुख व त्यांचा कार्यकाळ :-
१) डॉ. व्ही. डी. राव (०९ – ११ – १९६४ ते १९ – ०९ – १९६९ )
२) श्री. व्ही. एस. कदम (२० – ०९ – १९६९ ते ३० – ०४ – १९७१)
३) श्री. एस. डी. कापसे (०१ – ०५ – १९७१ ते २९ – ०९ – १९७४)
४) श्री. व्ही. एस. कदम ( ३० – ०९ – १९७४ ते १५ – ०६ – १९७५)
५) डॉ. बी. आर. कांबळे (१६ – ०६ – १९७५ ते १५ – ०६ – १९८०)
६) प्रो. बी. आर. कांबळे ( १६ – ०६ – १९८० ते ३१ – १० – १९९२)
७) प्रो. व्ही. एस. कदम ( ०१ – ११ – १९९२ ते ३१ – १० – १९९५)
८) प्रो. बी. आर. कांबळे ( ०१ – ११ – १९९५ ते ३१ – ०८ – १९९८)
९) प्रो. व्ही. एस. कदम (०१ – ०९ – १९९८ ते २० – ०४ – १९९९)
१०) प्रो. ए. आर. भोसले ( २१ – ०४ – १९९९ ते ३१ – १२ – २००३)
११) प्रो. एम. ए. लोहार (०१ – ०१ – २००४ ते १० – ०६ – २००४)

१२) प्रो. ए. आर. भोसले (११ – ०६ – २००४ ते २० – ०४ – २००८)
१३) प्रो. एम. ए. लोहार ( २१ – ०४ – २००८ ते २० – ०४ – २०१४)
१४) प्रो. एम. पी. पाटील ( २१ – ०४ – २०१४ ते ३१ – ०३ – २०१५)
१५) प्रो. श्रीमती पी. ए. पाटील ( ०१ – ०४ – २०१५ ते ३१ – ०३ – २०१७)
१६) डॉ. श्रीमती. एन. डी. पारेकर (०१ – ०४ – २०१७ ते आजपर्यंत)